देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचे मुखपत्र

देशस्थ ऋग्वेदी पत्रिका

दुरध्वनी : ०२५३-२५९६४३६, भ्रमणभाष : ९३७३०९६६८९
Website: www.drbs nashik.in
Email : drbs2011@gmail.com

Bharat Sarkar R. N. 35920 /25-10-2025
दर महिन्याच्या ५ तारखेस अंक पोस्टात
(GPO, Nashik) टाकला जातो. मूल्य : ₹ १.००

इंटरनेटआवृत्ती

प्रिंटीग दि. ०१/१०/२०२६

* वर्ष ४९ * अंक १० * ऑक्टोबर २०२६
* वार्षिक वर्गणी रु. २०० * नाशिक *

अध्यक्ष : विजयकुमार क्षीरसागर * कार्याध्यक्ष / संपादक : सुहास पाटील * कार्यवाह : नरेंद्र कुलकर्णी * खजिनदार : चंद्रशेखर तारे * कार्यकारी संपादक : मंदार तगारे

देशस्थ ऋग्वेदी संस्था नवरात्रोत्सव २०२६



रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ ते मंगळवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२६ पर्यंत संस्थेच्या वतीने नवरात्रोत्सव साजरा करण्याचे योजिले आहे.

रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील व महिला शाखा सदस्य सौ. मनीषा सुहास पाटील यांचे हस्ते घटस्थापना करण्यात येईल. गुरुवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता श्री ललिता पंचमी निमित्त प्राकृत श्री देवी महात्म्य पठण करण्यात येईल. रविवार दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वा. दुर्गाष्टमीनिमित्त होमहवन व पूर्णाहुती सौ. संगीता व अतुल मधुकर कुलकर्णी यांच्या हस्ते होईल. दरम्यान नेहमी प्रमाणे दररोज सकाळी ८ वा. अभिषेक, आरती व दुपारी ४. ३० वाजता भजनी मंडळाचे भजनाचा कार्यक्रम व सायंकाळी ७ वा. आरती होईल.

तरी या नवरात्रोत्सवाच्या कार्यक्रमास सर्व भाविक व सदस्य यांनी उपस्थित राहावे व उत्सवास सढळ हाताने मदत करावी असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

संस्थेचा गणेशोत्सव उत्साहात संपन्न



संस्थेचे खजिनदार चंद्रशेखर तारे व महिला शाखा सहकार्यवाह सौ. सविता तारे यांचे हस्ते सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४.३० वा. गणपतीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. पौरोहित्य योगेश मांडवगणे गुरुजी यांनी केले.

यावेळी महिला शाखेच्या कार्याध्यक्ष श्री. कुमुदिनी कुलकर्णी, संदीप गोसावी, संस्थेचे व्यवस्थापक दीपक जहागीरदार व कर्मचारी दत्तात्रय देवळालकर व सभासद उपस्थित होते. गणपती विसर्जन शनिवार दिनांक १९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वा. करण्यात आले. या वेळी संस्थेचे कार्यवाह नरेंद्र कुलकर्णी, व्यवस्थापक दीपक जहागीरदार व कर्मचारी दत्तात्रय देवळालकर भाविक व सभासद आदी उपस्थित होते.

देशस्थ ऋग्वेदी संस्थेची ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न !



शनिवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी देशस्थ ऋग्वेदी संस्थेची ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी ४.०० वा.संस्थेच्या श्री दुर्गा मंगल कार्यालयात घेण्यात आली. आवश्यक गणपूर्ती नसल्याने सभा तहकूब करून काही अपरिहार्य कारणाने मा. अध्यक्ष विजयकुमार क्षीरसागर उपस्थित नसल्यामुळे मा. उपाध्यक्ष मकरंद सुखात्मे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी ४.३० वा. सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

प्रारंभी उपाध्यक्ष मकरंद सुखात्मे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दिपप्रज्वलन व श्री दुर्गादेवीच्या प्रतिमेचे पुजन उपाध्यक्ष मकरंद सुखात्मे, विश्वस्त मुकुंद कुलकर्णी, मोहिनीराज कुलकर्णी,चंद्रकांत कुलकर्णी, डॉ. गोपाल सावकार, कार्याध्यक्ष सुहास पाटील, सहकार्याध्यक्ष सचिन निरंतर, कार्यवाह नरेंद्र कुलकर्णी व खजिनदार चंद्रशेखर तारे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यवाह नरेंद्र कुलकर्णी यांनी उपस्थित सर्व सभासद , पदाधिकारी यांचे स्वागत व प्रास्ताविक केले. तद् नंतर सहकार्याध्यक्ष सचिन निरंतर यांनी अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सभासद, हितचिंतक व देणगीदार तसेच इतर मान्यवर व ज्ञात अज्ञात यांना श्रद्धांजलीचा प्रस्ताव मांडला.

विषय क्रमांक १- दि. ०४/०१/ २०२६ च्या वार्षिक सभेचे इतिवृत्ता वाचून कायम करणे.

सहकार्यवाह राजेंद्र खेडलेकर यांनी ४ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या मागील ८९ व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त सादर केले. इतिवृत्तावर सर्वश्री कुणाल देशपांडे, उमेश कुलकर्णी यांनी चर्चा केली.चर्चेअंती इतिवृत्त मंजूर झाले.

विषय क्रमांक २- सन २०२५-२६ अखेरचे अहवाल, जमाखर्च, ताळेबंद वाचून मंजूर करणे.

सन २०२५-२६ चा अहवाल संस्थेचे कार्यवाह श्री. नरेंद्र कुलकर्णी यांनी सभागृहापुढे सादर केला. ते म्हणाले की, अहवाल वर्षात नवीन सभासद अपेक्षेपेक्षा कमी झालेले आहेत. ते वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. चर्चे अंती अहवाल मंजूर करण्यात आला. तसेच सन २०२५ -२६ चे जमाखर्च, ताळेबंद खजिनदार श्री चंद्रशेखर तारे यांनी सभागृहापुढे सादर केले. यावर उपस्थित सभासद डॉ. श्री. एकनाथ कुलकर्णी, कमलेश नांदुर्डीकर, संदीप गोसावी, सुधीर करंजीकर, श्री. श्रीनिवास चित्राव यांनी आपल्या शंका उपस्थित केल्या. त्यावर कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, खजिनदार श्री. चंद्रशेखर तारे शंकांचे निरसन केले. विषय सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ३ - सन २०२६-२७ चे अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

सन २०२६-२७ चे अंदाज पत्रक खजिनदार श्री. चंद्रशेखर तारे यांनी सादर केले. त्यावर डॉ. श्री. एकनाथ कुलकर्णी , कमलेश नांदुर्डीकर आदी सभासदांनी प्रश्न उपस्थित केले. श्री दुर्गा मंगल कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी सध्या पाच लाख रुपयांची अंदाजपत्रकात शिफारस केलेली आहे. नाशिक मधील तज्ज्ञ वास्तूविशारद, ठेकेदार यांच्याशी चर्चा करून दुरुस्तीबाबत निर्णय घेण्यात येईल असे कार्यवाह नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले. चर्चे अंती विषय मंजूर करण्यात आला.

विषय क्रमांक -४ नवीन वर्षासाठी सनदी हिशेब तपासनीस व अंतर्गत हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

सन २०२६-२७ या वर्षासाठी सनदी हिशेब तपासनीस व अंतर्गत हिशेब तपासनीस यांच्या निवड प्रक्रीये बाबतचे अधिकार संस्थेच्या कार्यकारी मंडळास देण्यात आला.

(पान नं. ५ वर)

तिकीट न लावता अंक पाठविण्यासाठीचा रजि. परवाना क्रमांक NSK 236 / 2021-2023
दर महिन्याच्या ५ तारखेस अंक पोस्टात (GPO, Nashik) टाकला जातो.

मुलांची नावे

वयोगट २५ ते २८

अभिषेक अनिल धुमाळ

२५, ५'१०'', मुद्गल, यजुर्वेदी, गोरा, देव, वृश्चिक, अनुराधा, मध्य, पहिले, O+ve, शिक्षण : B.Sc. (Statistics), नोकरी : सरकारी नोकरी, मा. प्रा. : ५ अंकी. अपेक्षा : मनमिळाऊ, अनुरूप, सरकारी नोकरी करणारी, पत्ता : श्री. अनिल वसंतराव धुमाळ, फ्लॅट नं. ५, आशुपालव बिल्डिंग, गंधर्व नगरी, नाशिकरोड-४२२१०१. मो. : ८८०५५६६५७०

वेद प्रमोद सायंदे (जोशी)

२५, ६'२'', भार्गव, यजुर्वेदी, गोरा, चष्मा आहे, देव, कर्क, पुष्य, मध्य, तिसरे, B-ve, शिक्षण : B.Tech., व्यवसाय : गुंतवणूक सल्लागार, मा. प्रा. : ६०,०००/-, अपेक्षा : गोरी, ग्रॅज्युएट, B.Tech., व्यवसाय/नोकरी करणारी, एकत्र राहणारी, पत्ता : श्री. प्रमोद शांताराम सायंदे (जोशी), १९, संगीत रेसिडेन्सी, चौक नं. २, गोविंदनगर, नाशिक-४२२००९. मो. : ९९६०३२८९२९, ९८९०३३३२११

गौरांग शंतनु ठोंबरे

२६, ५'८', वत्स, गहू, राक्षस, यजुर्वेदी, चष्मा आहे, कुंभ, धनिष्ठा, मध्य, तृतीय, O-ve, शिक्षण : B.E. (Electrical), MBA, नोकरी : किर्लोस्कर फेरस लि., अहिल्यानगर, मा. प्रा. : ३५,०००/-, अपेक्षा : नोकरी असल्यास उत्तम, घरातील सगळ्यांशी मिसळून वागणारी, पत्ता : श्री. शंतनु विष्णू ठोंबरे, सार्थक बंगला, अंकुर सोसायटी, शिंदे मळा, बँक ऑफ महाराष्ट्र कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर. मो. : ९४२१४३७५९०, ९८९०४४८७४०

वेदांत अनिल कुलकर्णी

२६, ५'१', कौशिक, यजुर्वेदी, सावळ, सौम्य, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, चतुर्थ, O+ve, शिक्षण : Bachlor of Architect, व्यवसाय : आर्किटेक्चर, इंटेरियर डिझाईन, कन्स्ट्रक्शन, मा. प्रा. : ३५-४०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, नोकरी, व्यवसाय, पत्ता : सौ. स्वाती अनिल कुलकर्णी, ११, पद्मनाभ, प्रशांतनगर, पाथर्डीफाटा, नाशिक-१०. मो. : ८०८७४८६१२०, ९६५७६२५५६१

प्रणव प्रविण कुलकर्णी

२६, ५'८', अगस्ती, ऋग्वेदी, गोरा, देव, तुळ, स्वाती, अंत्य, चवथे, AB+ve, शिक्षण : B.Com., C.A., नोकरी : जॉन्सन कंट्रोल, पुणे, मा. प्रा. : ९१८००/-, अपेक्षा : अनुरूप, कुटुंबवत्सल, उच्चशिक्षित, CA/ICW/B.E., पत्ता : श्री. प्रविण रत्नाकरराव कुलकर्णी, मालिनी, प्लॉट नं. २५, गट नं. १४६, साईनगर, बडिबल पास रोड, सातारा, परीसर, उन्नमती, संभाजीनगर-४३१०१०. मो. : ७५८८५३२८३२, ९४०४००२८५७

अजय दिलीप जोशी

२६, ५'४'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, मंगळ, चष्मा आहे, राक्षस, मकर, धनिष्ठा, मध्य, पहिले, B+ve, शिक्षण : M.Tech food Technology, नोकरी : Production Officer, मा. प्रा. : ५७५००/-, अपेक्षा : सुस्वभावी, मनमिळाऊ, एकत्र कुटुंबाची आवड असणारी, पत्ता : श्री. दिलीप वासुदेव जोशी, रेणुका निवास, आंबेकर गल्ली, मु. पो. दिंडोरी, नाशिक. मो. : ८६००५४१२१५, ९९२२४२००६४

ओंकार प्रशांत कुलकर्णी

२७, ५'६'', गौतम, यजुर्वेदी, गोरा, देव, वृषभ, मृग, मध्य, मंगळ, पहिले, B+ve, शिक्षण : IT Engineer, नोकरी : TCS, Pune, मा. प्रा. : ५५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, दिसण्यास सुंदर, गोरी, पत्ता : श्री. प्रशांत अरविंद कुलकर्णी, यादव अपार्टमेंट नं. ७, संभाजीनगर, अशोकनगर, नाशिक-४२२०१२, मो. : ९८५०७४१२४८, ८९२८५७२८२७

ऋषिकेश श्रीकांत जोशी

२७, ५'६'', भार्गव, देशस्थ यजुर्वेदी, गव्हाळ, चष्मा आहे, देव, मीन, रेवती, अंत्य, प्रथम, O+ve, शिक्षण : MCS (IT Engineer), नोकरी : सॉफ्ट कंपनी, पुणे, मा. प्रा. : ८३,०००/-, अपेक्षा : सुशिक्षित, अनुरूप, गृहकृत्यदक्ष, नोकरी करणारी, कुटुंबवत्सल, पत्ता : श्री. श्रीकांत मधुकर जोशी, फ्लॅट नं. ४०१, स्वामी कुबेर रेसिडेन्सी, डेकेअर शाळेजवळ, कानिफनाथ चौक, राजीवनगर, नाशिक-४२२००९. मो. : ९३७०७७७०९०, ९३२६१९००६६

प्रतिक श्रीपाद कुलकर्णी

२७, ५'११'', वशिष्ट, ऋग्वेदी, सावळा, सौम्य मंगळ, देव, मेष, अश्विनी, आद्य, चवथे, चष्मा आहे, O+ve, शिक्षण : B.Tech (Mech.), MBA सारखा फॅमिली बिझनेस कोर्स (एसपी जैन), व्यवसाय : स्वत:चा फॅमिली बिझनेस, मा. प्रा. : २ लाख, अपेक्षा : कुठल्याही शाखेची पदवीधर व स्वतंत्र प्रोफाईल असलेली, पत्ता : श्री. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, फ्लॅट नं. ७, अत्रेय अपार्टमेंट, चैतन्य नगर, गंगापूररोड, नाशिक-४२२०१३. मो. : ९८५०८१३७८८

अनिकेत संदिप करंजीकर

२७, ५'२'', जमदग्नी, देशस्थ ऋग्वेदी, गोरा, देव, मेष, अश्विनी, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : MCA (Master in Computer Application), नोकरी : सर्टिफाईड टॅक्स सर्व्हिसेस रोडे आईसलॅड (यूएसए), वा.प्रा. : ६.८२ लाख, अपेक्षा : अनुरूप, साधारण, पत्ता : श्री. संदिप सुधाकर करंजीकर, रो-हाऊस नं. ४, गजानन वाटीका, उमिया-आशिष को-ऑप. हौसिंग सोसायटी, शिवनगर, मेरी, नाशिक-४२२००४. मो. : ९८९०२०२५८०, ९८९०२०१९६५

ओंकार प्रशांत कुलकर्णी

२७, ५'९'', कृष्णात्रे, यजुर्वेदी, सावळा, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, चवथे, B+ve, शिक्षण : Production Engg. मा. प्रा. : ८०,०००/-, नोकरी : आयटी क्षेत्रात, अपेक्षा : समजुतदार, मनमिळाऊ, मोकळ्या स्वभावाची, नोकरी/व्यवसाय चालेल. पत्ता : श्री. प्रशांत वसंतराव कुलकर्णी, ए-१०२, हरिओम पॅराडाइज, कलानगर, निसर्ग नगर, रिलायन्स पेट्रोलपंपाजवळ, दिंडोरी रोड, मेरी, नाशिक-४२२००४. मो. : ८००७१७७०३७, ८७९९८०९०८२

अद्वैत पुल्केशी टांकसाळे

२७, ५'८'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, देव, मीन, रेवती, अंत्य, पहिले, A+ve, शिक्षण : B.Com., LLB, मा. प्रा. : ५०,०००/- +२५,०००/- Rent, व्यवसाय : वकिली, नाशिक कोर्ट, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. पुल्केशी पद्माकर टांकसाळे, २१, अनंतकोटी, ऋग्वेद मंगल कार्यालयामागे, नवीन तिडके कॉलनी, नाशिक-४२२००८. मो. : ९४२०८२८१६८, ९८९००४६१८७

पुष्कर विजय कुलकर्णी

२७, ५'५'', भार्गव, दे. ऋग्वेदी, सावळा, मनुष्य, सिंह, पूर्वा, मध्य, पहिले, B+ve, शिक्षण : B.Com., C.S. (App.), व्यवसाय : रिअल इस्टेट (पार्टनरशिप फर्म), मा. प्रा. : ६०-७०,०००/-, अपेक्षा : मनमिळाऊ, नोकरी करणारी, पत्ता : श्री. विजय प्रभाकर कुलकर्णी, ब्लॉक नं. २, श्री मधुबन हौसिंग सोसायटी, तारवाला नगर, दिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक-४२२००४. मो. : ९८२२८०४८३८, ९०११८२८५०२

आनंद मनोहर उदारे

२७, ५'७'', वशिष्ठ, ऋग्वेदी, राक्षस, तुळ, विशाखा, अंत्य, प्रथम, O+ve, शिक्षण : M.Tech. (Mech.), नोकरी : प्रायव्हेट, नवी मुंबई, मा. प्रा. : ७१,०००/-, अपेक्षा : पत्रिका बघणार, शिकलेली असावी, पत्ता : श्री. मनोहर विष्णू उदारे, अ-७, २ रा मजला, मोहन प्रासाद, रमेदी वसई, पालघर-४०१२०१, मो. : ९४०३९३३४५५, ७७०९२६७४५५

कमलेश योगेश्वर देशपांडे

२७, ५'६'', कामकायन, दे. ऋग्वेदी, नीमगोरा, देव, मिथुन, मृग, मध्य, तिसरे, O+ve, शिक्षण : B.Com., LL.B., DTL, नोकरी : लिगल एक्झिक्युटीव्ह, बजाज हौसिंग फायनान्स, नाशिक. मा. प्रा. : ३५,०००/-, अपेक्षा : मनमिळाऊ, सुस्वरूप, धार्मिक, अनुरूप, सुसंस्कारी, सुशिक्षित, पत्ता : श्री. योगेश्वर श्रीकांत देशपांडे, श्रीविठ्ठल मंदिर संस्थान, पिंपळनेर, जि. धुळे-४२४३०६, मो. : ९४०३३२७८३६, ९४२१८८९४९६

युवराज महेश कुलकर्णी

२७, ५'९'', कौशिक, ऋग्वेदी, गोरा, चष्मा आहे, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, तिसरे, O+v, शिक्षण : B.Com., नोकरी : ॲक्सिस बँक, नाशिक. मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : शिकलेली, मनमिळाऊ, घर सांभाळणारी, पत्ता : श्री. महेश गोविंद कुलकर्णी, फ्लॅट नं. ७०५, शिवालिक सागर, पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वर नगर, नाशिक-१०. मो. : ९६२३६२५५००, ९४०३७३६२१८

तन्मय प्रभाकर पंडित

२७, ६', जमदग्नी, ऋग्वेदी, गोरा, देव, तुळ, स्वाती, अंत्य, तिसरे, B+ve, शिक्षण : S.S.C., पौरोहित्य शिक्षण व इतर कोर्सेस. व्यवसाय : पौरोहित्य, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : समजुतदार, नोकरी करणारी किंवा इच्छा असल्यास करू शकेल, फिरायची आवड, सपोर्टीव्ह, पत्ता ; श्री. प्रभाकर विठ्ठल पंडित, के. एल. ५-ए, बिल्डींग नंबर १, रुम नंबर १२, सेक्टर -१, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८. मो. : ७४९८९८३२१७, ९०८२८२८९९०

पराग अनिल कस्तुरे

२७, ६'३'', वशिष्ठ, ऋग्वेदी, गोरा, देव, कन्या, हस्त, आद्य, दुसरे, O+ve, शिक्षण : B.E. Computer Engineer, नोकरी : IT Software Engineer, वा. प्रा. : १५ लाख, अपेक्षा : उत्तम, नोकरी हवी, शाकाहारी, सुसंस्कारी, पत्ता : श्री. अनिल राजाराम कस्तुरे, ५०१, मालती हाईट्स, पोकार कॉलनी, आरटीओ कॉर्नर, दिंडोरी रोड, मेरी, नाशिक-४२२००४. मो. : ९७६५७०५४४९, ८३९०६१०५५९

ऋग्वेद प्रदीप कुलकर्णी

२७, ५'६'', काश्यप, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, कन्या, उत्तराषाढा, आद्य, तिसरे, B+ve, शिक्षण : B.E. (Electrical Engineering), नोकरी : पॅनासॉनिक लाइफ सोल्यूशन्स प्रा. लि., ठाणे, मा. प्रा. : ७०,०००/-, अपेक्षा : B.E. Electrical / Computer/ Electronics/ Mechanical, नोकरीस प्राधान्य, पत्ता : श्री. प्रदीप किशनराव कुलकर्णी, प्लॉट नं. २५/ स. नं. ७६७, तिडकेनगर, उंटवाडी, नाशिक-४२२००८. मो. : ९८१९१२५५१८

कुशल कृष्णा कुलकर्णी

२८, ५'८'', मौनीभार्गव, ऋग्वेदी, निमगोरा, चष्मा आहे, मनुष्य, मीन, उत्तरा भाद्रपदा, मध्य, तिसर, A+ve, शिक्षण : B.E. (Chemical), JAIIB, CAIIB, नोकरी : स्टेट बँक ऑफ इंडिया, T.O., मा. प्रा. : १.१० लाख, अपेक्षा : पदवीधर, सुस्वभावी, सुसंस्कृत, दोन्ही कुटुंबांना सांभाळणारी, पत्ता : श्री. कृष्णा जगन्नाथ कुलकर्णी, वैष्णवी रो-हाऊस, आदर्शनगर, म्हसरूळ-मखमलाबाद लिंक रोड, नाशिक. मो. : ९९२२४४४७६८

प्रसाद वसंत काळकर

२८, १७० सेमी, विश्वामित्र, देशस्थ ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, कन्या, उत्तरा फाल्गुनी, आद्य, तृतीय, शिक्षण : B.E. (Electrical), नोकरी : मा. प्रा.: ३५,०००/-, अपेक्षा :अनुरूप, मनमिळाऊ, सुसंस्कृत, पत्ता : श्री. वसंत श्रीकृष्ण काळकर, प्लॉट नं. १२६, मोहन नगर, वृंदावन गार्डनजवळ, महाबळ जळगाव-४२५००१. मो. : ९५११८६३४४०, ९४२२३५७३८४

प्रसाद प्रकाश धर्माधिकारी

२८, ५'८'', विश्वामित्र, ऋग्वेदी, गोरा, देव, मिथुन, पुनर्वसू, आद्य, तृतीय, AB+ve, शिक्षण : B.E. Computer Science, Pune, नोकरी : Sr. Software Engineer, मा. प्रा. : ९५,०००/-, अपेक्षा : स्वभाव चांगला असावा, मनमिळाऊ, सुसंस्कृत असावी, पत्ता : श्री. प्रकाश नारायण धर्माधिकारी, फ्लॅट नं. ३, मुरलीधर हाईट्स, गोविंद नगर, चौक नं. ५, नाशिक-४२२००९. मो. : ९९२१०४६२८०, ९८२३०१५७९८

प्रसन्न मनोहर देवधर

२८, ५'५'', कौशिक, कोकणस्थ ब्राह्मण, गोरा, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, दुसरे, O+ve, शिक्षण : B.Com., नोकरी : Genpact, पुणे, वा.प्रा. : १० लाख, अपेक्षा : मध्यमवर्गीय, गृहकृत्यदक्ष, पत्ता : श्री. मनोहर काशीनाथ देवकर, ९, पिनाक सोसायटी, बापू बंगल्याजवळ, इंदिरानगर, नाशिक. मो. : ९९७००४१८७७, ८४८४८९४७७१

तेजस सतिश भटमुळे

२८, ५'१०'', भारद्वाज, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, विशाखा, अंत्य, चवथे, B+ve, शिक्षण : B.Com., MBA, नोकरी : IDFC Bank, Mumbai, मा. प्रा. : ६५,०००/-, शा. व्यंग : डाव्या हाताला एक बोट नाही. अपेक्षा : पदवीधर, सुसंस्कृत, पत्ता : श्री. सतिश दत्तात्रय भटमुळे, फ्लॅट नं. ९०४, श्री तिरुमाला आशियाना अपार्टमेंट, चेतनानगर, नाशिक-४२२००९. मो. : ९१६८०८९७३२

अभिषेक शशिकांत पाटील

२८, ५'११'', काश्यप, ऋग्वेदी, गोरा, देव, वृश्चिक, अनुराधा, मध्य, दुसरे, B+ve, शिक्षण : B.E. (Mechanical), नोकरी : Infosys, Kharadi (Pune), मा. प्रा. : ८०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. शशिकांत तुकाराम पाटील, प्लॉट नं. ११, लक्ष्मीपुरम फेज -२, पिसादेवी रोड, भगतसिंग नगर, छत्रपती संभाजीनगर-४३१००८. मो. : ९८९०९७८१७१

केदारेश्वर संजय कुलकर्णी

२८, ५'८'', कौशिक, ऋग्वेदी, गोरा, देव, कन्या, हस्त, आद्य, प्रथम, AB+ve, शिक्षण : M.Com., MBA, CA, नोकरी : बिझसोल इंडिया, पुणे, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : पदवीधर, गृहकृत्यदक्ष, नोकरी असली तरी चालेल. पत्ता : श्री. संजय तुकाराम कुलकर्णी, बी-१०१, रामजानकी संकुल, चैतन्यनगर, गंगापूररोड, नाशिक-४२२०१३ मो. : ९४२२७४१३३८, ९४२२२४५३३०

प्रतिक दत्तात्रय राळेगावकर

२८, ५'५'', वसिष्ठ, सावळा, देशस्थ ऋग्वेदी, मनुष्य, कन्या, उत्तरा, मंगळ आहे, आद्य, तृतीय, O+ve, शिक्षण : M.Com., नोकरी : बँक ऑफ महाराष्ट्र, मा. प्रा. : ५०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पदवीधर, पत्ता : श्री. दत्तात्रय मनोहर राळेगावकर, ६, राशी व्हिलाज, विठ्ठलवाडी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३. मो. : ९८२२३५६७१९

निखिल संजय पानसे

२८, ५'८'', मुद्गल, दे. ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, कन्या, हस्त, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.E. IT (Mumbai Univercity), नोकरी : Infosys, Pune, वा. प्रा. : १०.६ लाख, अपेक्षा : नोकरी करणारी, शाकाहारी, निर्व्यसनी, शक्यतो ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक वा शहरी भागात राहणारी असावी, पत्ता : श्री. संजय पानसे, ए-१०३, ज्येष्टराज, पी ॲन्ड टी कॉलनी, डोंबीवली (पूर्व)-४२१२०४. मो. : ९८९२५४७२३२, ९३२३१०९८२७

अक्षय सुमंत दिक्षित

२८, ५'६'', गौतम, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, वृषभ, कृत्तिका, अंत्य, चवथे, B+ve, शिक्षण : B.E. Civil, व्यवसाय : अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड मॅनेजमेंट, मा. प्रा. : १ लाख, अपेक्षा : इंजिनिअर, MBA, BAMS, पत्ता : डॉ. सुमंत ईच्छाराम दिक्षित, फ्लॅट नं. ११/१२, स्वामी अपार्टमेंट, स्वामी नारायण नगर, स्वा. सावरकर स्मारकसमोर, पंचवटी,

नाशिक-३. मो. : ९८९०९८१४१६

नेत्रदीप नारायण जोशी

२८, ५'६'', कृष्णात्रय, यजुर्वेदी, गव्हाळ, देव, वृश्चिक, अनुराधा, मध्य, चवथे, A+ve, शिक्षण : C.A., नोकरी : आदित्य बिर्ला कॅपिटल, वा.प्रा. : १४ लाख, अपेक्षा : अनुरूप, समंजस, पदवीधर, पत्ता : श्री. तुषार भास्कर देशपांडे, प्लॉट नं. ५, वनराज होम्स, पाथर्डी फाटा, इंदिरानगर, नाशिक-४२२००९, मो. : ९२७०३७६२१०, ९९२१०२२६९०

मिथिलेश सतिश देशपांडे

२८, ६'२'', गौतम, देशस्थ ऋग्वेदी, गोरा, चष्मा आहे, मनुष्य, सिंह, पूर्वा फाल्गुनी, मध्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.Com., नोकरी : वासन बजाज, मा. प्रा. : २०,०००/-, अपेक्षा : मनमिळाऊ, सुस्वभावी, गृहलक्ष्मी, नोकरी करणारी किंवा न करणारी, पत्ता : श्री. सतिश मनोहर देशपांडे, एन ३२, एफ १/६/३, सप्तश्रृंगी चौक, लेखानगर, सिडको, नाशिक-४२२००९. मो. : ९८९०५९९२२५

सत्यम संजय पाटील

२८, ५', कौशिक, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, कन्या, चित्रा, मध्य, प्रथम, शिक्षण : B.A. (History) MSW, नोकरी : टि.डी. के. प्रा. लि., सातपूर, वा. प्रा. : ९.५ लाख, अपेक्षा : अनुरूप, पत्ता : श्री. संजय भास्कर पाटील, पिंपरी (बु.।।) पो. पिंपळगाव हरेश्वर, ता. पाचोरा, जि. जळगाव-४२४२०३. मो. : ७४९९०८४१४९

विकास राजेंद्र कुलकर्णी

२८, ५'५'', पाराशर, ऋग्वेदी, देव, वृषभ, रोहिणी, मध्य, पहिले, O+ve, शिक्षण : M.Com., DTL, नोकरी : सिनिअर अकौंटट, मा. प्रा. : ६०,०००/-, अपेक्षा : Open Minded, Perfect each other, पत्ता : श्री. राजेंद्र कुलकर्णी, पाथर्डी फाटा, नाशिक-४२२०१०, मो. : ९५६१९२८७४३

श्रेयस राजेंद्र सोमाणी

२८, ५'६'', वशिष्ठ, ऋग्वेदी, मनुष्य, मीन, उ. भाद्रपदा, मध्य, दुसरे, चष्मा आहे, O+ve, शिक्षण : B.E. Electronics & Telecommunication, नोकरी : Software Engg at. Opentext, Bengaluru, मा. प्रा. : १.५० लाख, अपेक्षा : समजूतदार, सुशिक्षित, मनमिळाऊ, पत्ता : श्री. राजेंद्र सोमाणी, रुम नं. २, पहिला माळा, स्काय स्क्रॅपर बिल्डिंग, वेस्टर्न रेल्वे ऑफिसर्स फ्लॅट, मुंबई सेंटल (पू.) मुंबई-४००००८, मो. : ९००४०३४१७६, ९००४०३९१७६

वयोगट २९ ते ३२

रामकृष्ण विश्वास व्यवहारे

२९, ५'६'', शांडिल्य, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, कर्क, आश्लेषा, अंत्य, प्रथम, O+ve, शिक्षण : B.E. (Civil), नोकरी : टर्फ बनवणे (नेटची कामे), मा. प्रा. : ३०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, घर सांभाळणारी, नोकरी करणारी नको, पत्ता : श्री. विश्वास गोविंद व्यवहारे, फ्लॅट नं. २०५, आकार सोसायटी, ए-विंग गंधर्व नगरी, नाशिकरोड-४२२१०१. मो. : ९४२१६०८०३८

प्रतिक प्रफुल्ल कुलकर्णी

२९. ५'८'', जमदग्नी, देशस्थ, राक्षस, सिंह, मघा, अंत्य, द्वितीय, O+ve, चष्मा आहे, शिक्षण : BBA, GDCA परीक्षा दिली आहे. नोकरी : व्यवसाय / अकाउंट्स मॅनेजर मिनी मॅक्स पंपस् प्रा. लि., विल्होळी. वा. प्रा. : ७ लाख, अपेक्षा : सुस्वरूप, सुशिक्षित, पत्ता : श्री. प्रफुल्ल प्रभाकर कुलकर्णी, दत्तप्रभा, दत्तवाडी, दत्तमंदिरासमोर, चाळीसगाव, जि. जळगाव-४२४१०१. मो. : ९८६०१६६६२६.

आदित्य अतुल मुळे

२९, ६'१'', भारद्वाज, यजुर्वेदी, गोरा, सौम्य मंगळ, मनुष्य, कुंभ, पूर्वा भाद्रपदा, आद्य, तिसरे, A+ve, शिक्षण : B.Com., MBA, नोकरी : डेप्युटी मॅनेजर, कोहिनूर ग्रुप, पुणे. वा. प्रा. : ९.५० लाख, अपेक्षा : पदवीधर, नोकरी करण्याची तयारी असावी, पत्ता : श्री. अतुल अनंत मुळे, भाग्यलक्ष्मी अपार्टमेंट, बी-१३, कामटवाडा रोड, नाशिक-४२२००९, मो. : ८०८७२५५३१८

वरद अजित पिंगळे

२९, ५'७'', कौशिक, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, वृषभ, रोहिणी, अंत्य, द्वितीय, O+ve, शिक्षण : M.Com., MBA, नोकरी : नामको बँक, नाशिक. मा. प्रा. : ३५,०००/-, अपेक्षा : ब्राह्मण, नोकरी करणारी, वयात अंतर २-३ वर्षे, पदवीधर असावी, पत्ता : श्री. अजित पुरुषोत्तम पिंगळे, ४०३, मंगला अपार्टमेंट, परबनगर, दत्तमंदिराजवळ, इंदिरानगर, नाशिक-४२२००९. मो. : ९४२३९६३६७७, ८४५९६९१५९७

प्रथमेश मुकुंद जोशी

२९. ५'६'', भारद्वाज, ऋग्वेदी, सावळा, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, आद्य, चवथे, A+ve, शिक्षण : B.E. (Computer), नोकरी : ब्रॉडकॉम, बेंगलूरू, मा. प्रा. : १.१० लाख, अपेक्षा : नोकरी करणारी, मनमिळावू, पत्ता : श्रीमती सुमेधा मुकुंद जोशी, ए-२५, गार्डन व्ह्यू अपार्टमेंट, बोराडे मळा, राजराजेश्वरी मंगल कार्यालयाजवळ, सैलानी बाबा, जेलरोड, नाशिकरोड-४२२१०१, मो. : ८६६८५३१२६५, ८९९९७१२३३४

मकरंद सतिश कुलकर्णी

२९, ५'५'', कौंडिण्य, यजुर्वेदी, गोरा, चष्मा आहे, देव, तूळ, स्वाती, अंत्य, तिसरे, B+ve, शिक्षण : B.Com., CCC, Tally, नोकरी : अकाऊंटंट, श्रीराम असोसिएट, मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : अनुरूप, गृहकृत्यदक्ष, मनमिळाऊ, पत्ता: श्रीमती निलिमा सतिश कुलकर्णी, २, जय गुरुदेव को-ऑप. सोसायटी, शिवनगर, तलाठी कॉलनीजवळ, तारवाला नगर मागे, नाशिक-४२२००३, मो. : ९८२३०६१६७३

आकाश राजेंद्र मुडावदकर

२९, ५'७'', भारद्वाज, यजुर्वेदी, गोरा, मनुष्य, मकर, उत्तराषाढा, अंत्य, चवथे, B+ve, शिक्षण : B.Com., नोकरी : Lucidus Energy, Nashik, वा. प्रा. : ३ लाख, अपेक्षा : शिक्षित, कुटुंबाचा सन्मान करणारी, पत्ता : अंजली राजेंद्र मुडावदकर, प्लॉट नं. ६५, अभ्युदय बंगला, अजिंक्य विलेज, कामटवाडा शिवार, नाशिक-४२२०१०. मो. : ९०२८१२८०६०

वर्धन अभय चंद्रात्रे

२९. ६', चंद्रात्रे, दे. यजुर्वेदी, गोरा, मनुष्य, वृषभ, रोहिणी, अंत्य, चतुर्थ, O+ve, शिक्षण : B.Sc. in Hospitality and Hotel Management, नोकरी : The Westin, Pune, वा. प्रा. : ५.५० लाख, अपेक्षा : अनुरूप, मनमिळाऊ, पदवीधर, नोकरी करणारी, वयात अंतर ०-४, पत्ता : श्रीमती नंदिनी अभय चंद्रात्रे, फ्लॅट नं. १, रामकृपा अपार्टमेंट, कलावती आई मंदिर, आदर्शनगर, रामवाडी, पंचवटी, नाशिक-४२२००३. मो. : ८६०५४०९९३०, ९०४९१६१४६५

प्रतिक लक्ष्मीकांत कुलकर्णी

२९, ५'७'', गौतम, ऋग्वेदी, देव, कन्या, षष्ठी, आद्य, पहिले, AB+ve, शिक्षण : B.Com., नोकरी : WNS, मा. प्रा. : २५,०००/-, अपेक्षा : समजुतदार, मनमिळाऊ, पत्ता : श्री. लक्ष्मीकांत मुरलीधर कुलकर्णी, एन ४२, सीसी १/४/७, डॉ. हेगडेवार नगर, दुर्गामाता मंदिराजवळ, ४ थी स्किम, सिडको, नाशिक. मो .: ९५०३८५९७५६, ९७६२७२३८५८

सौरभ सुनील पंडीत

३०, ५'९'', भार्गव, यजुर्वेदी, गहू, मनुष्य, धनू, उत्तराषाढा, अंत्य, पहिले, इ+र्गिश. शिक्षण : एा्ढउ, एपसळपशशी, नोकरी : वा. प्रा. : १२ लाख, अपेक्षा : सुशिक्षित, मनमिळाऊ, समजूतदार, पत्ता : श्री. सुनील विठ्ठल पंडीत, 'साई समर्थ पार्क', फ्लॅट नं. ८, आदित्य हॉलजवळ, इंदिरानगर, नाशिक-४२२००९. मो .: ९२७००२००३०, ९०२१०२१०६५

वरूण विश्वेश जोशी

३०, ५'८'', भार्गव, ऋग्वेदी, गोरा, राक्षस, कुंभ, धनिष्ठा, आद्य, पहिले, O+ve, शिक्षण : M.Pharmacy, PhD (Appear), नोकरी, मा. प्रा. : ४५,०००/-, अपेक्षा : शाकाहारी, सुसंस्कृत, नोकरी असल्यास चालेल, पत्ता : श्री. विश्वेश पांडुरंग जोशी, गणेशनगर, गल्ली क्र. १६, संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२६०५. मो. : ९०२१३००९०२, ७८२२८८९९०२

कृष्णा विजय भागवत

३०, ५'६'', गर्ग, यजुर्वेदी, सावळा, क्षत्रिय, सौम्य मंगळ, मनुष्य, धनू, पूर्वाषाढा, मध्य, तिसरे, O+ve, शिक्षण : MBA, Finance, नोकरी : गोदरेज कॅपिटल, नाशिक. मा. प्रा. : ७०,०००/-, अपेक्षा : मनमिळाऊ, समजून घेणारी, पत्ता : श्री. विजय नारायण भागवत, एन ४१, सीडी १/२३/१२, हेडगेवार नगर, नवीन सिडको, नाशिक-८. मो. : ९६०४४३९३७२, ९५०३८४४५८७

प्रसन्न पद्माकर देशपांडे

३०, ५'९'', काश्यप, ऋग्वेदी, गव्हाळ, राक्षस, मकर, धनिष्ठा, मध्य, द्वितीय, B+ve, शिक्षण : M.A. English (App.), French B-2 Level, Spanish, Mech. Engg. Diploma, नोकरी : अकाऊंटींग स्पेशालिस्ट, ॲमेझॉन, हैद्राबाद, मा. प्रा. : ८०,०००/-, अपेक्षा : नोकरी/व्यवसायाची आवड असणारी, कुटुंबाला धरून राहणारी, उंच हवी. पत्ता : श्री. पद्माकर रघुनाथ देशपांडे, अ-१०, डीजीपीनगर-१, पुणे रोड, नाशिक-४२२००६. मो. : ८७९६९७७१२१, ९४२०६९५१२७

वेदांग संजीव पोळ

३०, ५'६'', काश्यप, देशस्थ ऋग्वेदी, चष्मा कामापुरता आहे, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, दुसरे, B+ve, शिक्षण : BCS IT, M.Tech., नोकरी : IT Wipro, हैद्राबाद, मा. प्रा. : २१,०००/-, अपेक्षा : अनुरूप, शिक्षण, नोकरी करायची इच्छा असल्यास चालेल, पत्ता : श्री. संजीव प्रभाकर पोळ, अखिलेश नगर, नवीन बस स्टॅण्डसमोर, ता. गंगापूर, छत्रपती संभाजीनगर-४३११०९, मो. : ९८५०९८१२५७, ९८६०३७१७०८

नितीश संजय साठे

३०, ५'९'', वशिष्ठ, कोकणस्थ ब्राह्मण, गोरा, देव, वृश्चिक, अनुराधा, मध्य, तिसरे, O+ve, शिक्षण : M.Com., C.A. Int. नोकरी, मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी, मनमिळावू, पत्ता : श्री. संजय नारायण साठे, वरदान, आझाद चौक, दोंडाईचा-४२५४०८. मो. : ७२७६६२१७२६, ९४२१५७०५२०

मंदार भगवान संत

३०. ५'६'', मुद्गल, ऋग्वेदी, गोरा, चष्मा आहे, राक्षस, सिंह, मघा, अंत्य, पहिले, AB+ve, शिक्षण : B.Sc., Computer Science, नोकरी : B.Tech Security Pvt. Ltd., Nashik, मा. प्रा. : ४०,०००/-, अपेक्षा : पदवीधर, नोकरीस प्राधान्य, सुस्वभावी, पत्ता : श्री. भगवान दिगंबर संत, श्रीप्रसाद अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, उंटवाडी, तिडके नगर, नाशिक-४२२००८. मो. : ९४०४७९६८७५, ९४०३४२२६३०

अभिषेक मोहन देशपांडे

३०, ५'९'', गौतम, ऋग्वेदी, गोरा, मनुष्य, मीन, उत्तरा भाद्रपदा, मध्य, तिसरे, B+ve, शिक्षण : B.Com., MBA (Marketing), नोकरी : Community Samachar Pvt. Ltd, Pune, वा. प्रा. : ९ ते ९.५० लाख, अपेक्षा : सुसंस्कृत, सुशिक्षित, शक्यतो नोकरी असावी, पत्ता : श्री. मोहन माधवराव देशपांडे, ३, रघुकुल अपार्टमेंट, रामनगर, इंदिरानगर, डे-केअर स्कूलजवळ, नाशिक-९. मो. : ९४२०७४६२४४, ९४२३४७६८५०

विपुल उल्हास राजपाठक

३१, ५'५'', काव्यायनी, यजुर्वेदी, मनुष्य, कुंभ, पुर्वा भाद्रपदा, आद्य, पहिले, चष्मा आहे, O-ve, शिक्षण : B.Com., व्यवसाय : श्रीकृष्ण वडापाव व चाट सेंटर, मा. प्रा. ४०,०००/-, अपेक्षा : गृहकर्तव्यदक्ष, मनमिळाऊ, नोकरी असल्यास उत्तमच, पत्ता : श्री. उल्हास श्रीकृष्ण राजपाठक, ब्लॉक नं. २०४, राजेश्वर अपार्टमेंट, दिपालीनगर, नाशिक-४२२००९. मो. : ९४२०८९०९४४, ८०२९७१२०३२

आनंद संजय तांबोळी

३१, ५'५'', कौशिक, यजुर्वेदी, राक्षस, सिंह, मघा, अंत्य, प्रथम, O+ve, शिक्षण : M.Com., नोकरी : चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फायनान्स कं. लि., मा. प्रा. : ६२,०००/-, अपेक्षा : पदवीधर, १२ वी, पत्ता : श्री. संजय नागनाथराव तांबोळी, एच नं. ५-३-३३९, तुळजा भवन, मारवाड गल्ली, सालासर हनुमान मंदिराजवळ, सराफ बाजार, इतवारा, नांदेड-४३१६०४. मो. : ९४०४६६००३४

शशांक शिरीष अग्निहोत्री

३१, १६८ सेमी, भारद्वाज, ऋग्वेदी, नीमगोरा, मनुष्य, कन्या, उत्तरा, आद्य, तिसरे, शिक्षण : BCA, नोकरी : As a Sales Rep. in Cosmetic Company + Business, वा. प्रा. : ४ लाख, अपेक्षा : वयात अंतर १ वर्षे चालेल, अनुरूप, पत्ता : श्री. शिरीष गोविंद अग्निहोत्री, बी /३०२, सद्गुरुकृपा, पोकळे वस्ती, धायरी, पुणे-४११०४१. मो. : ९७६२८४५६५४

रजनिल विकास कुलकर्णी

३१, ५'४'', उपमन्यू, देशस्थ ऋग्वेदी, सावळा, राक्षस, कुंभ, शततारका, आद्य, प्रथम, A+ve, शिक्षण : डिप्लोमा, डिग्री, बी.ई. इलेक्ट्रिकल, नोकरी : खाजगी नोकरी, मा. प्रा. : २०,०००/-, अपेक्षा : अनुरूप, पदवीधर, पत्ता : श्री. विकास रामचंद्र कुलकर्णी, ००१, वक्रतुंड, कळंभे, आग्रारोड, कोर्टाजवळ, शहापूर, जि. ठाणे-४२१६०१. मो. : ९३२६५००२३०, ८६९१०९५३०२

यशवंत जयंत डांगे

३१, ५'५'', गार्ग्य, यजुर्वेदी, गोरा, राक्षस, वृश्चिक, ज्येष्ठा, अंत्य, तिसरे, B+ve, शिक्षण : BCA, नोकरी : मार्केटींग आणि सेल, मा. प्रा. : १५,०००/-, अपेक्षा : सुस्वभावी, अनुरूप, गृहिणी चालेल, नोकरी असली/नसली तरी चालेल, पत्ता : श्री. जयंत रामदास डांगे, आई श्री खोडीयार अपार्टमेंट, संत जनार्दन नगर, विजयनगरमागे, औरंगाबादनाका, पंचवटी, नाशिक. मो. : ९१७५१६५८३८


ऐश्वर्य अरूण बापट

३१, ५'११'', वशिष्ठ, कोकणस्थ, सावळा, मनुष्य, मेष, भरणी, मध्य, पहिले, O+ve, शिक्षण : B.Tech., Computer Engg., नोकरी : DOTPAY Pvt. Ltd., Gurgoan, मा. प्रा. : ६५,०००/-, अपेक्षा : नोकरी करणारी किंवा करू शकणारी, मनमिळाऊ, आयटी क्षेत्रातील असल्यास उत्तम, पत्ता : श्री. अरुण वसंत बापट, सी-६, पारिजात कॉलनी, नेहरू नगर, विलासपूर, छत्तीसगढ-४९५००१, मो. : ९६०४०४३३४४, ७८२८३९३९०८

मोहित मिलींद खरे

३१, ५'८'', कौशिक, कोकणस्थ, राक्षस, मेष, कृत्तिका, अंत्य, पहिले, चष्मा, B+ve, शिक्षण : Diploma in Financial Programming & Policies, Diploma in Financial Risk Management (IIMB), (IMF), नोकरी : Ankurish Enterprises Printing Press स्वत:चे जागेत, मा. प्रा. : ६०,०००/-, अपेक्षा : आनंदी, मोकळ्या स्वभावाची, नोकरी/व्यवसाय करणारी असल्यास चांगलेच, वयात अंतर ०-६ वर्षे, शाकाहारी, पदवीधर, कोणत्याही शाखेतील, पोस्ट ग्रॅज्युएट, मनमिळाऊ, समजून घेणारी, पत्ता : श्री. मिलिंद गणेश खरे, ५, रंगनाथ

तिकीट न लावता अंक पाठविण्यासाठीचा रजि. परवाना क्रमांक NSK 236 / 2021-2023
दर महिन्याच्या ५ तारखेस अंक पोस्टात (GPO, Nashik) टाकला जातो.



पदमाकर देशपांडे

श्रीदत्त महात्म्य

षष्ठाध्याय:

सहजपणे अज्ञान नाहीसं झालं ज्ञानाने भगवत प्रेमाचे बंधन पडलेलं आहे ते कोण तोडेल? त्याप्रमाणे दत्त त्याला लोटून देत होते तरी देखील तो शिष्य त्यांना सोडत नव्हता. ज्याप्रमाणे लोहचुंबक लोखंडाला धरतं त्याप्रमाणे तो राजा दत्ताला धरून होता. त्यांचे पाय धरून त्यांची सेवा करत होता.

मद्य-मांस आणून दे, माळा किंवा हार चंदन आणून दे, फळे आणून दे अशा प्रकारे तो सेवा करीत होता. निद्रा आणि आळस सोडून त्यांच्या चरणावर मन लावून काही न सांगता तो उच्चिष्ठ पान प्रसाद घेत होता. त्याचं मन जाणून ईश्वर कौतुक करत होते. ते त्याला जमिनीवर पाडत होते पण त्याचं नेत्र कटाक्षाने रक्षण करत होते. त्याच्यावर माया करत होते.

ते हसून म्हणाले, ''राजा हे अरिष्ट दारुण आहे. इथून पळत परत जा. मरण येईल असं वाटतं. अशुद्ध संगतीचं फळ मिळेल. मी अमंगळ आहे. कर्म बहिष्कृत आहे. मला भक्ष्य अभक्ष्य काही नाही. मी उन्मत्त नग्न आहे, नग्न स्त्रिला घेऊन तिच्याशी क्रीडा करत आहे. माझा संसर्ग दोष तुला विशेष लागलेला आहे. त्यामुळे तुझा प्राण शोष होईल, प्राण निघून जाईल. तुला त्रास होईल.''

असं वचन ऐकले, तरी गर्ग मुनिंचाउपदेश समोर होऊन नमस्कार करून तो अर्जुन दत्ताला म्हणाला, ''देवा, तू मला व्यर्थ का मोहवतोस? तुझं काय रुप आहे ते मी जाणलेलं आहे. मनाने लोकांच्या सारखे बोलतोस मात्र वेगळ्या लीला दाखवतोस. तू सर्वात्मा महापुरुष आहेस. तू मायेने हा वेश घेतलेला आहे. तू निर्विशेष असून देखील स्व विशेष असा भासत आहेस. तू अनघ निश्चल निरागस आहे. अनघा ही शक्ती आहे आणि स्वत:वर तू तिला आपल्याकडे घेतल्याचा एक प्रकारचा देखावा निर्माण केलेला आहे. हे जग निर्माण झाले, जगामध्ये तू असशील तरी हे जग हे मृगजळाप्रमाणे आहे. हे विकारी दुष्ट, नष्ट जग आहे. तू आणि चराचर याच्यामध्ये असलेले अंतर ओळखत नाही तो भेद पाहणारा पामर माणूस शास्त्राने बद्ध होतो. सर्वात शुद्ध असलेला तू शुद्ध नाही अशाप्रकारे संभावना करतात ते बद्ध आहेत. तेच खरे अशुद्ध आहेत. अज्ञ लोकांनाच हा भेद दिसतो, तेच धर्म आणि वेदांनी बांधले गेलेले आहेत, तू तर पूर्णपणे बंधनरहित आहेस. देह जावो किंवा राहो तुझ्या रूपामध्ये मन निश्चळ होवो. विपरीत भावना न राहो. हाच माझा हे भगवंता निश्चय आहे.''

असं अर्जुनाच वचन ऐकून श्री दत्त प्रसन्न होऊन म्हणाले, '''हे राजपुत्रा, तू धन्य आहेस. तुला मी वरदान देतो काय मागायचं ते माग. तू भक्तीतत्त्व जाणतोस; म्हणून मला सोडत नाहीस. तू जिवलग आहेस. मला आवडतो. तू माझा चांगला भक्त आहेस. जे माझे अनन्यभक्त आहेत त्यांच्यापाशी मी सतत राहतो. जे अभक्त आहेत त्यांना दु:ख मिळते. तू देहाचा स्वार्थ न धरता भोगाचा अर्थ सोडून माझी यथार्थ सेवा केली आणि जन्माचे सार्थक केले आहे.''

असे दत्ताने बोलल्यावर तो राजा प्रसन्न झाला, त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हा निरीच्छ असून प्रारब्धामुळे हे बोलत आहे. देवा, तू ''प्रसन्न झाला असशील, तर आम्हाला सर्व समृद्धी दे. माझ्या एकट्याला प्रजापालनाचे सामर्थ्य दे. धर्माचं कार्य करण्यासाठी विरोध होणार नाही, अशा प्रकारे नि: सीम यश मिळावं, मी शक्तीचे केंद्र व्हावं, माझं नाव नष्ट होऊ नये, अशा प्रकारचा वर मला दे. धर्माने प्रजेचे पालन करावे. दुसऱ्याच्या चित्ताचे ज्ञान व्हावे. स्मरण करेल त्यांना दर्शन घडावं. गडावर सर्व सिद्धी अवगत व्हाव्या. इच्छा केल्यावर सहस्त्रबाहूंचे बळ मिळावे. कायम जय मिळावा. नेहमी इच्छित स्थानी जाण्यासाठी अकुंठित गती असावी. सदा सर्वज्ञता असावी. स्वर्गापासून पाताळापर्यंत गती असावी. कुमार्गाकडे प्रवृत्ती होऊ नये. सदा सत्संगती प्राप्त व्हावी. पूज्य असलेले अतिथी घरी यावे. भांडारामध्ये अक्षय्य द्रव्य असावं. भूमीवर शत्रू राहू नये. पृथ्वीवर साम्राज्य व पूर्ण आयुष्य मिळावं. धारातीर्थी मरावं तुल्यबळ असलेल्यांना मारावे. तुमची नित्य स्मरणभक्ती असावी. परमेश्वराच्या चरणी सदोदित अव्यभिचारी भक्ती असावी, हीच माझी मनाची आवड आहे.''

असं म्हणून त्याने नमस्कार केला. प्रभू म्हणाले, ''हे वर दिले! तू सप्तद्वीपांचा ईश्वर होशील.'' असं योगेश्वर म्हटले आणि त्यांना सुंदर असे दोन हात फुटले. मग प्रेमाने त्याने देवाला दृढ आलिंगन दिल. देवाला आलिंगन दिल्यानंतर त्याचा द्वैतभान नाहीसं झालं आणि तो निश्चल राहिला. त्याची अंत:स्थिती ओळखून वरदान चित्तामध्ये आणून त्यावर माया सोडली पुन्हा त्याला वर उठवलं.

श्री दत्त म्हणाले, ''महिष्मती नगरीस जाऊन विधीपूर्वक राज्याभिषेक करून घे ही माझी आज्ञा आहे. अर्जुनाने भावपूर्वक नमन करून तथास्तु असे म्हटले.''

तो म्हणाला, ''आपलं वचन मला शिरसावंद्य आहे. आपलं विस्मरण होऊ नये, माझं स्मरण असावं. आपले चरण हेच माझं जीवन आहे. इथे आपलं मन हेच प्रमाण. ज्याप्रमाणे बाळाला सोडून कासवीण लांब गेली तरी त्याचं स्मरण करून ती त्याला जीवन देऊ शकते त्याप्रमाणे भक्तांना तुमची आठवण झाली असता जीवन येते. कासवीण विसरली तर बाळ पंचत्वास पावते. कासविणीकडून भ्रमाचा प्रमाद घडू शकतो. तुम्ही स्वच्छंद ईश्वर आहात, तुम्हाला भ्रम प्रमाद माहिती नाही, अशी साक्ष वेद देतात. तुमच्या आज्ञेमुळे मायेने जीवावर आवरण घातलेलं आहे. माया ही दारूण आहे म्हणून भ्रमण करायला लागतं. त्याच मायेचं आवरण तुम्हाला पडत नाही, म्हणून लौकिक माया इंद्रजाल वगैरे यांची उपमा तुमच्या पुढे चालत नाही. आपल्या स्वाधीन असलेली, आपल्या आश्रयास असलेली माया अन्य लोकांना मोहात पाडते. ती आपला आश्रय कधी सोडत नाही हे तिन्ही लोकांना ठाऊक आहे. पाळलेल्या कुत्र्याला 'छू' म्हटल्यावर तो दुसऱ्याला धरतो. धन्यावर किंवा त्याची सेवा करणाऱ्या घरावर भुंकत नाही. त्याप्रमाणे तुझा भक्त असेल त्याच्यापुढे माया ही अशक्त होते. मी तुझा भक्त आहे हे व्यक्त केले आहे. अव्यक्त माया माझ्यापुढे काय करेल? आम्हाला मायेचे भय नाही. आमच्यापुढे काळ काय? आपले पाय आठवले की, आम्ही दैव रेषेवर देखील पाय देऊ. देवा आता योगक्षेमाचा विषय सोडून देतो. जिथे तिथे तुझ्या कथा आम्ही नम्र माथा करून गात राहू. आता असं मागणं आहे की, 'आम्हाला विसरू नका. स्मरण केलं की, आम्हाला वाचवा!' हे गाऱ्हाणे आम्ही पुन्हा पुन्हा सांगतो.''

असं म्हणून अर्जुन मागे पाहून चालायला लागला. ज्याप्रमाणे सून सासरी जाताना पुन्हा पुन्हा फिरून मागे पाहते त्याप्रमाणे मनात स्मरण ठेवून राजा रेवा नदीच्या काठी आला. माहिष्मती नगरामध्ये तो आला. त्याच्यासमोर नागरिक आणि मंत्री स्वागतासाठी आले. देव ऋषी आणि महर्षी आले आणि त्यांनी आनंदाने त्याच्यासमोर मंत्र, वाद्यघोष करीत सुवर्णपात्राद्वारे अभिषेक केला.

विधीपूर्वक औदुंबराची ओली फांदी घेऊन त्याने त्याचा अभिषेक केला. तीर्थांनी अभिषेक करून नाना वेद शाखांचे मंत्र म्हटले. त्यावेळी त्याने दीन, अंध, गरीब यांना क्षेत्र म्हणजे भूमी, गाई, सुवर्ण इत्यादींचे दान केले. भरपूर अन्नदान केलं. वसु रुद्र आदित्य हे देव तसेच मरुदगण, विश्वदेव यांनीही राजाला अभिषेक केला असा मोठा महोत्सव तिथे झाला. महाराज अर्जुनानी सर्वांचं पूजन केलं. त्यांचा आशीर्वाद त्याला मिळाला. 'सुखी हो! आयुष्मान हो!'

नाना राजे करभार घेऊन समोर आले. त्याचा डांगोरा फिटण्यात आला. ते सगळं नागरिक ऐकत होते. ''माझ्या वाचून जो हातामध्ये शस्त्र धरेल किंवा जो हिंसा, चोरी करेल त्याला मी ठार मारेन.'' असं त्याचं वचन ऐकून लोकांनी शस्त्र टाकून दिली आणि त्याच्या भीतीने ते वचन पाळायला लागले. त्याच्यापुढे लीन होऊन राहायला लागले. तोच क्षेत्रपाळ झाला. ग्रामपाळ, पशुपाळ, सेना, धान्य, धनपाळ, ब्राह्मणांचे रक्षण करणारा देखील तोच झाला.

अग्नी, चोर, शत्रू यांच्यामुळे प्रजा व्याकुळ झाली असता नाना रूपे धरून त्यांचा सांभाळ तो करायला लागला. अशा तऱ्हेने विपत्ती दूर करणारा तो राजा झाला. त्याचं नाव घेतल्यानंतर तो हरवलेली वस्तू सापडत असे. ध्यान केल्यावर तो दर्शन देत असे. सर्वत्र आरोग्य निर्माण झालं. सगळीकडे योग्य त्या ठिकाणी योग्य असा पाऊस पडायला लागला. धरणी सुफल झाली. राजाने यज्ञ केले. त्रैलोक्याचे पालन करण्यासाठी तो फिरू लागला. न्याय देऊन अनेक लोकांना तृप्त केलं. माघ कृष्ण अष्टमीच्या दिवशी अनघाष्टमी व्रत करून ब्राह्मणांना दुसऱ्या दिवशी भोजन देण्याचा नियम तो प्रतिवर्षी पाळायला लागला. जो हे अष्टमी व्रत करेल तो नर सुखी होईल. हे बोल जो मानेल, त्याचे संपूर्ण कल्याण होईल. अशा प्रकारचा वर त्याला मिळाला त्या दिवसापासून मोठा उत्सव करीत प्रेमाने श्री दत्ताचे वारंवार दर्शन तो करू लागला. बळीराजा, सहस्त्रकर रवी प्रमाणे तो अत्यंत तेजस्वी राजा चांगली कीर्ती संपादन करून वाईट गोष्टी नष्ट करीत राहिला. ज्याला विस्मरण नाही, जो शरणागताचे रक्षण करतो, सर्व ऐश्वर्य भोगून जगामध्ये आपल्या पराक्रमाची गाथा वदवतो असा हा देव आहे.

श्लोक : न नूनं कार्तवीर्यस्य, गतीम यास्याति पार्थिवा:।
यज्ञ दान तपो योग श्रुत वीर्य जयादिभि:।।

एक दिवशी सहस्त्रनारी घेऊन रेवा नदीच्या काठी स्वच्छंदपणे अर्जुन क्रीडा करीत असताना देवांच्या शत्रू असलेला रावण तिथे आला. अर्जुन हा महाशूर असल्याचे नारदाचे वचन जाणून तो रात्री युद्ध करण्यासाठी आला. त्याला पाहिल्यावर त्या नारीना अर्जुनाने नेत्र संकेत करून स्त्रियांकरवी त्याला बंधनात अडकवले आणि लहान मुलाला खेळण्यासाठी आपल्या सदनात आणून ठेवलं. पोरं झाले त्याचे हात त्याला गरगरा फिरवायला लागले. रात्रीच्या हे कुबेराला कळलं तेव्हा त्याने राजाची प्रार्थना करून त्याला सोडवलं. असा बलवान अर्जुन आपल्या नगरीतच नित्य राहून नानारूपी सप्तद्वीप धुंडाळून धर्माने राज्य कारभार करीत होता. 'नमस्ते कार्तवीर्याय' हा त्याचा मंत्र आहे. त्यामुळे सर्व अरिष्टाचा क्षय होतो हा निश्चित जाणावा त्याला प्रणव बीज लावून जपले असता भवबंधापासून सुटका होते. 'ऱ्ही' बीज लावून जप केला, तर सर्व ऐश्वर्य मिळते. 'ऐं' बीज लावलं, तर मंत्रशक्तीच्या प्रभावामुळे वाकसिद्धी होते. सर्व विद्यांमध्ये पारंगत होतो. एक लक्ष जप केला तर कार्य सिद्ध होते. मंत्रशक्तीच्या प्रभावामुळे विविध लाभ होतात. 'श्रीं' बीज लावलं, तर लक्ष्मी मिळते. 'द्राम्' बीज लावलं, तर अपमृत्यू टळतो. रोगपीडा पळून जाते, आरोग्य मिळतं. 'वषट्' बीजाने वशीकरण होतं. 'वौषट्' बिजामुळे आकर्षण होतं. 'हुं' बीज लावलं, तर विद्वेष नाहीसा होतो, होतं 'फट्' बिजामुळे उच्चाटन. 'ठ: ठ:' बीजामुळे स्तंभन होते. 'खें खें' बीजामुळे मारण होतं. 'नम:' बीजामुळे संपन्न होतं. 'स्वाहा' केलं, तर पोषण होतं. 'सौ:' असं बीज म्हटलं, तर क्षोभन होतं. 'क्लिम' असं बीज लावलं, तर वशीकरण होतं. 'हुं फट्' बीजामुळे ग्रह, भुतांचे निवारण होतं. 'प्रणव' बीजामुळे क्षय रोग, मेह, सन्नीपात, श्लेष्म ज्वर, कुष्ठ, गळू, पैत्तिक वात, देश काल संगतीमुळे लागलेले सर्व रोग किंवा वात पित्त, कफ तिन्ही प्रकारचे हे उत्पात प्रणव लावल्यामुळे शांत होतात.

दुसऱ्यांनी जर आपल्याला काही घातक प्रयोग केले असतील, तर त्याचाही अंत होतो. दत्त हा या अनिष्ट गोष्टी नष्ट करतो. सहस्त्र जपामुळे वित्त मिळते. रात्री तुपाचा दीप लावून एकांतात लावून जप केला असता हे प्रयोग साध्य होतात. हा श्लोक असा आहे –

कार्तवीर्योर्जुनो नाम । राजा बाहू सहस्त्रवान ।
तस्य स्मरणमात्रेन । गतं नष्टं च लभ्यते ।।

इतीश्रीमत्परमहंसवासुदेवानंदसरस्वतीवीरचिते
श्री दत्तमहात्मे श्री दत्तावतार कथनं नाम
षष्ठध्याय: श्री गुरुदेवदत्तात्रेयार्पणमस्तु ।

(क्रमश:)

(पान नं. १ वरून)

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा...

विषय क्रमांक ६– दि. २३ ऑगस्ट,२०२६ रोजी झालेल्या २०२६ ते २०२६ या त्रैवार्षिक निवडणुकीची सविस्तर माहिती देणे.

कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील यांनी २३ ऑगस्ट,२०२६ रोजी झालेल्या २०२६ ते २०२६ या त्रैवार्षिक निवडणुकीचा विस्तृत अहवाल सादर केला.

विषय क्रमांक ६ – श्री दुर्गा मंगल कार्यालयाच्या दुरुस्तीबाबत विचार विनिमय करणे.

संस्थेचे कार्यवाह श्री. नरेंद्र कुलकर्णी यांनी श्री दुर्गा मंगल कार्यालयाच्या दुरुस्तीबाबत माहिती सभागृहापुढे सदर केली. या बाबत विषय क्रमांक ३ मध्ये नमूद केले आहे.

